N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** नवी मुंबई **P.S.(ठाणे):** तळोजा **Year (वर्ष):** 2019

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0102 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 13/06/2019 14:33 बजे

2. **S.No. (अ.क्र.) Acts (अधिनियम)** **Sections (कलम)**

| S.No. | Acts | Sections |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार
   **Time Period (कालावधी):** पहर 5
   **Date From (दिनांक पासून):** 30/01/2019
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 30/01/2019
   **Time From (वेळेपासून):** 14:00 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 14:26 बजे
2. **Day(दिवस):** गुरूवार
   **Time Period (कालावधी):** पहर 5
   **Date From (दिनांक पासून):** 31/01/2019
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 31/01/2019
   **Time From (वेळेपासून):** 13:00 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 14:02 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 13/06/2019 **Time (वेळ):** 13:35 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद** 023 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 13/06/2019 14:19 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्तळ):**

1.**(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 2 किमी
**Beat No. (बिट क्र.):**
**(b) Address (पत्ता):** TMA तळोजा, तळोजा एमआयडीसी,पनवेल

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

2.**(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 2 किमी
**Beat No. (बिट क्र.):**
**(b) Address (पत्ता):** एमएसईडीसीएल शाखा कार्यालय, नावडे तोंडरे,पनवेल

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** धनाजी विठ्ठल जळक

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती का नाव)**

(c) **Date/Year of Birth (जन्म** 1978 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (अदा केल्याची तारीख):**

**Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | अन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंब,ए पी एम सी ,नवी मुंबई,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | अन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंब,ए पी एम सी ,नवी मुंबई,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-7057964747

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | लोकसेवक श्री. महेश सावंत | | | 1. एमएसईडीसीएल शाखा कार्याल,नावडे - तोंडरे,,पनवेल,तळोजा ,नवी मुंबई, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):**

फिर्याद दिनांक 13/06/2019मी धनाजी विठ्ठल जळक, वय 41 वर्षे, पोलीस निरीक्षक, अन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई समक्ष सरकारतर्फे फिर्याद लिहून देतो की,मी वरील प्रमाणे असून माहे जुन 2016 पासुन अन्टी करप्शन ब्युरो. नवी मुंबई विभाग कार्यालयात पोलीस निरीक्षक म्हणुन नेमणुकीस आहे.तक्रारदार श्री. विशाल विश्राम कदम, वय- 32 वर्ष, व्यवसाय - विदयुत ठेकेदार, रा. धरणा कम्प, पो. तळोजा, ता. पनवेल, जि. रायगड हे हरेष इंटरप्रायझेस याकपंनीचे प्रोप्रायटर असून ते त्यं◌ाचे पार्टनर श्री. सुनिल इटकले यांच्यासोबत सदर कंपनीच्या नावे तळोजा परिसरातील नविन बांधकाम झालेल्या इमारतींना विदयुत मिटर बसविण्याचे काम करीत आहेत. सावित्री गु◌्रप यांचे प्लाट नं. 51, तळोजा फेज -1, सेक्टर नं.5, तळोजा पाचनंद, तळोजा, ता. पनवेल, जि. रायगड येथील नवीन बांधकाम झालेल्या इमारतीस नविन वीज मिटर लावण्याचे कान्ट्रक्ट सदर इमारतीचे बांधकाम करणारे सावित्री गु◌्रपचे श्री. मिश्रा यांच्याकडून हरेष इंटरप्रायझेस याकंपनीस

मिळाले आहे. सावित्री ग्रुप यांचे प्लाट नं. 51, तळोजा फेज -1, सेक्टर नं.5, तळोजा पाचनंद, तळोजा, ता. पनवेल, जि. रायगड येथील नवीन बांधकाम झालेल्या इमारतीस त्यांनी मागणी केलेप्रमाणे एम.एस.ई.डी.सी.एल. पनवेल शहर उपविभाग कार्यालय यांच्याकडून वीज मिटर मंजूर झाले होते. त्याप्रमाणे सदर नविन विज मिटरच्या प्रमाणे कोटेशनची फी भरणा केल्यानंतर नमुद इमारतीचे नविन वीज मिटर पनवेल कार्यालयाकडून मंजुर झालेले आहेत. परंतु एस.एस.ई.डी.सी.एल. शाखा कार्यालय नावडे येथील सहायक अभियंता श्री. महेश सावंत हे सदर मंजुर झालेले विद्युत मिटर ताब्यात देण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे रू. 20,000/- लाचेच्या रक्कमेची मागणी करीत असून एम.एस.ई.डी.सी. एल. शाखा कार्यालय, नावडे येथील सहायक अभियंता श्री. महेश सावंत यांनी मागणी केलेले पैसे त्यांना देण्याची तक्रारदार यांची कोणतीही इच्छा नव्हती. म्हणून सहायक अभियंता श्री. महेश सावंत यांचेवर योग्य ती कायदेशीर कारवाई होणेबाबत तक्रारदार श्री. विशाल कदम यांनी दि. 29/01/2019 रोजी अन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई कार्यालयात समक्ष लेखी तक्रार दिली आहे.तक्रारदार श्री. विशाल कदम यांनी दिलेल्या तक्रारीमधील एस.एस.ई.डी.सी.एल. शाखा कार्यालय नावडे येथील सहायक अभियंता श्री. महेश सावंत हे तक्रारदार यांच्याकडे खरोखरच लाचेची मागणी करतात किंवा कसे याबाबत शासकीय पंच साक्षिदारांसमक्ष दि. 30/01/2019 रोजी लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, पडताळणी दरम्यान तक्रारदार हे लोकसेवक श्री. महेश सावंत यांना टी.एम.ए. तळोजा येथे जावून भेटले. त्यावेळी लोकसेवक श्री. महेश सावंत यांनी तक्रारदार यांना त्यांच्या स्कार्पिओ गाडीमध्ये असलेले नविन विद्युत मिटर ताब्यात दिले. त्यानंतर तक्रारदार यांनी सदरचे नविन मिटर त्यांच्या गाडीमध्ये ठेवून ते सदर ठिकाणावरून निघून जात असताना लोकसेवक श्री. महेश सावंत हे तक्रारदार यांच्या गाडीजवळ आले. त्यावेळी लोकसेवक श्री. महेश सावंत यांनी तक्रारदार यांना चला मं असे बोलत लाचेच्या रक्कमेबाबत हाताने इशारा केला असता, तक्रारदार यांनी त्यांना कधी भेटू मं अशी विचारणा केली. त्यावर श्री. महेश सावंत हे त्यांना तुमच्यावर आहे कधीही भेटा असे बोलले असता, तक्रारदार यांनी तसं काय तुम्ही बोललात तर भेटू ना हेचं कसं काय बोलायच... सुनिलशी बोललात तुम्ही असे बोलून सदर कामाच्या अनुशंगाने त्यांचे पार्टनरशी काही बोलणे झाले का याबाबत विचारणा केली असता, श्री. महेश सावंत यांनी नाही काहीच नाही मी काहीच बोलत नाही तुमचं तुमच्यावर असतं सगळ असे बोलले. त्यानंतर तक्रारदार हे सदर ठिकाणावरून निघून येत असता, श्री.महेश सावंत हे पुन्हा तक्रारदार यांच्या कार जवळ गेले व त्यांना फक्त कसं हाय सध्या मला थोडं पैसे ते आईच्या हेला लागतायत केमोला वगैरे रिलीज झालं तर बरं होईल जरा हं... असे बोलून त्यांनी यापुर्वी मागणी केलेले सदर कामाचे पैसे लवकर देण्याबाबत सांगितले होते. सदर समक्ष भेटी दरम्यान झालेल्या संभाषणामध्ये लोकसेवक श्री. महेश सावंत यांनी तक्रारदार यांच्याकडे लाचेच्या निश्चित रक्कमेची मागणी केलेली नाही. परंतु तक्रारदार हे त्यांचे इतर फाईलच्या संदर्भात लोकसेवक श्री. महेश सावंत यांना त्यांचे कार्यालयात चौकशी करण्यासाठी गेल्यावर लोकसेवक श्री. महेश सावंत हे त्यांच्याकडून सदर कामाचे पैसे घेतल्याशिवाय त्यांचे इतर कोणतेही काम करणार नाहीत असे तक्रारदार यांनी पंचासमक्ष सांगितले होते. तक्रारदार व लोकसेवक श्री. महेश सावंत यांच्या समक्ष भेटी दरम्यान झालेले संभाषण डिजीटल व्हाईस रेकार्डरमधील मेमरीकार्डमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आले असून तसा दि. 30/01/2019 रोजीचा सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आला आहे. त्यानंतर दि.31/01/2019 रोजीचे लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, पडताळणी दरम्यान तक्रारदार हे लोकसेवक श्री. महेश सावंत, सहायक अभियंता, एम.एस. ई.डी.सी.एल. शाखा कार्यालय, नावडे - तोंडरे येथे जावून भेटले. त्यावेळी तक्रारदार यांनी लोकसेवक श्री. महेश सावंत यांना फाईल होती टेम्परवारीची हाय असे सांगून त्यांनी कामाची फाईल सहायक अभियंता श्री. महेश सावंत यांना दाखविली. श्री. महेश सावंत यांनी सदर फाईल मधील कागदपत्रांची पाहणी केल्यानंतर फाईल ताब्यात घेवून फाईलमधील नमुद मिटरसाठी आवश्यक फिजीबिलीटी लेटर तक्रारदार यांच्याकडे दिले. त्यानंतर तक्रारदार यंानी श्री. महेश सावंत यांना साहेब येवू साहेब असे बोलले असता, श्री. महेश सावंत यांनी त्यांना हाताच्या बोटांनी पैश्याबाबत इशारा केला. त्यावेळी तक्रारदार यांनी बोललो मी कालचं कालचं मी बोललेल बोललो सुनिललला करतो बोलला आज असे लोकसेवक श्री. महेश सावंत यांना बोलले असता, श्री. महेश सावंत यांनी हा... चालेल... मला कसं हाय ते हा ना एका केमोला पंचेचाळीस ते पन्नास हजार असा खर्च येतो... त्या रेंजमध्ये खर्च येतो असे त्यंाना संागितले. त्यावेळी त्यांनी श्री. महेश सावंत यांना देतो दुपारी तुम्ही तिकडे येणार आहेत ना तिकडे येणार आहेत ना फेज वनला वीस पंचवीस हजार रूपये करतो असे सांगितले असता, श्री. महेश सावंत यांनी जास्त करून असे त्यांना सांगितले. त्यावर त्यांनी श्री. महेश सावंत यांना जास्त करू... अशी विचारणा करता, श्री. महेश सावंत यांनी पन्नास असू दया असे त्यांना सांगितले. त्यावर त्यांनी श्री. महेष सावंत यांना बघतो जेवढं होईल तेवढं.... किती असे सांगितले असता, श्री. महेश सावंत यांनी पन्नास करा सरळ... काय असेल हिशोब तुम्हीच तुमच्याजवळ ठेवा... हिशोबवही मी काय तुम्हाला विचारत नाही दोनच दा एकदा तुम्हाला मागितले होते पण तेव्हा नाही मिळाले ते मुलीच्या शिक्षणाकरीता त्यावेळी लागणार होते आणि आता हे नाहीए तर एवढं असे बोलून तक्रारदार यांचे तक्रारीमधील नमुद मंजुर मिटर ताब्यात दिलेबाबत तक्रारदार श्री. विशाल कदम यांच्याकडे रू. 50,000/- लाचेच्या रक्कमेची मागणी करीत असल्याचे पडताळणीमध्ये निष्पन्न झाले आहे. सदरचे संभाषण डिजीटल व्हाईस रेकार्डरमधील मेमरीकार्ड मध्ये ध्वनिमुद्रीत करण्यात आलेले आहे. त्याबाबत दिनांक 31/01/2019 रोजी सविस्तर पडताळणी पचंनामा करण्यात आलेला आहे. एस.एस.ई.डी.सी.एल. शाखा कार्यालय नावडे येथील सहायक अभियंता श्री. महेश सावंत हे रू. 50,000/- लाचेच्या रक्कमेची मागणी करीत असल्याचे निष्पन्न झाल्याने दि. 01/02/2019 रोजी पंच साक्षिदारांसमक्ष लोकसेवक सहायक अभियंता श्री. महेश सावंत यांच्याविरूध्द एस.एस.ई.डी.सी.एल. शाखा कार्यालय नावडे- तोंडरे येथे लाचेचा सापळा आयोजीत केला असता, लाचेच्या सापळ्या दरम्यान लोकसेवक श्री. महेश सावंत हे त्यांच्या आईच्या उपचारासाठी गेल्याने त्यांच्या कार्यालयात उपस्थित नसल्याबाबत माहिती मिळून आल्यानंतर सदर सापळा कारवाई स्थगित करण्यात आली होती. त्यानंतर लोकसेवक श्री. महेश सावंत, सहायक अभियंता, एम.एस.ई.डी.सी.एल. शाखा कार्यालय, नावडे - तोंडरे, नवी मुंबई यांनी तक्रारदार यांच्याकडे मागणी केलेल्या लाचेच्या रक्कमेबाबत तक्रारदार यांचेकडे पाठपुरावा केला नाही. त्यामुळे लोकसेवक श्री. महेश सावंत हे तक्रारदार यांच्याकडून लाचेच्या रक्कमेचा स्विकार करणार नसल्याची खात्री झाल्यानंतर, लोकसेवक श्री. महेश सावंत यांनी तक्रारदार यांच्याकडे मागणी केलेल्या लाचेच्या रक्कमेच्या अनुषगाने त्यांच्याविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन 1988 (संशोधन सन 2018) चे कलम 7 प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची परवानगी मिळणेबाबत मा. पोलीस अधीक्षक, अन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांना अहवाल सादर करण्यात आला होता. त्याप्रमाणे मा. पोलीस अधीक्षक, अन्टी करप्शन, ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांनी त्यांचे कार्यालयीन जा.क्र. अंसीबी/ठाणे/सावंत सहा. अभियंता/2019/1991, दि. 12/06/2019 अन्वये लोकसेवक श्री. महेश सावंत, सहायक अभियंता, एम.एस. ई.डी.सी.एल. शाखा कार्यालय, नावडे - तोंडरे, नवी मुंबई यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन 1988 (संशोधन सन 2018) चे कलम 7 प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची परवानगी दिली आहे. अशाप्रकारे यातील लोकसेवक श्री. महेश सावंत, सहायक अभियंता, एम.एस.ई. डी.सी.एल. शाखा कार्यालय, नावडे - तोंडरे, नवी मुंबई यांनी त्यांना लोकसेवक या नात्याने मिळालेल्या पदाचा व अधिकाराचा दुरूपयोग करुन यातील तक्रारदार श्री. विशाल विश्राम कदम, विदयुत ठेकेदार, रा. धरणा कम्प, पो. तळोजा, ता. पनवेल, जि. रायगड यांच्याकडे सावित्री ग्रुप यांचे प्लाट नं. 51, तळोजा फेज -1, सेक्टर नं.5, तळोजा पाचनंद, तळोजा, ता. पनवेल, जि. रायगड येथील नवीन बांधकाम झालेल्या इमारतीस मंजुर झालेले विज मिटर ताब्यात देण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे रू. 50,000/- लाचेच्या रक्कमेची मागणी करुन त्यांनी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन 1988 (संशोधन सन 2018) चे कलम 7 प्रमाणे गुन्हा केला आहे. म्हणून माझी लोकसेवक श्री. महेश सावंत,

सहायक अभियंता, एम.एस.ई.डी.सी.एल. शाखा कार्यालय, नावडे - तोंडरे, नवी मुंबई यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन 1988 (संशोधन सन 2018) चे कलम 7 प्रमाणे सरकारतर्फे कायदेशीर फिर्याद आहे.

13. **Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे VISHAL RAMBHAU **Rank (पद):** I (Inspector)
**No.(क्र.):** DGPVRBM7903 **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची
**Name** (नाव): AJAYKUMAR SURYAKANT LANI
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PBMAH65293

विशाल रा. राजवाडे
सहा. पो. निरीक्षक
तळोजा पो. स्टे.

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /**
(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)